# MPSC Combined Mains 2022: Most Expected Questions for PSI, Download PDF

1.अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार) प्रतिबंध कायदा, 1989 नुसार गुन्हा घडण्याकरिता कोणत्या बाबी आवश्यक आहेत?

A. तक्रारदार अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील असावा.
B. आरोपी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील नसावा.
C. वरील दोन्ही
D. वरीलपैकी 1 किंवा 2

Answer ||| C

2.खालीलपैकी कोणती कृत्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 च्या अंतर्गत दंडनीय अपराध आहेत?

अ) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची नाही अशा A व्यक्तीने अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीच्या B व्यक्तीस किळसवाणा अन्नपदार्थ खाणे भाग पाडले.

ब) अनुसूचित जातीच्या A व्यक्तीने आपल्या जातीच्या B या व्यक्तीची जमीन अवैध मार्गाने हडप केली.

क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तीने अनुसूचित जाती किंवा जमातीच्या सर्व व्यक्तींना त्याच्या खाजगी मंदिरात येऊन पूजा करण्यास परवानगी दिली नाही.

ड) अनुसूचित जातीच्या व्यक्तीने आपल्या ऑफिस मधील उच्चवर्णीय अनुसूचित जाती किंवा जमातीच्या नसलेल्या महिला लिपिकाची लैंगिक छळवणूक केली.

A. अ आणि क
B. कोणतेही नाही
C. अ फक्त
D. वरील सर्व

Answer ||| C

3.अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम 1989 नुसार पुढील गोष्टींचा विचार करा आणि अत्याचार घडला आहे की नाही ते सांगा .

अ)
SC किंवा ST व्यक्तीच्या राहण्याच्या जागेमध्ये किंवा त्याच्या प्रवेशद्वाराजवळ विष्ठा, मैला, जनावरांचे मृत शरीर किंवा इतर कोणताही किळस उत्पन्न करणारा पदार्थ टाकला असेल.

ब)
SC किंवा ST व्यक्तीला इजा पोहोचेल किंवा त्रास होईल यादृष्टीने त्याच्या शेजारी विष्ठा, टाकाऊ कचरा, जनावरांची मृत शरीरं किंवा इतर कोणताही किळस उत्पन्न करणारा पदार्थ टाकला असेल.

क) SC किंवा ST व्यक्तीच्या गळयात पादत्राणांची माळ घालेल किंवा नग्न अवस्थेत किंवा अर्धनग्न अवस्थेत धिंड काढली तर.

A. अ आणि ब मध्ये अत्याचार झाला आहे, क मध्ये नाही.
B. फक्त क मध्ये अत्याचार झाला आहे, अ आणि ब मध्ये नाही.
C. वरील तीनही उदाहरणांमध्ये अत्याचाराचा गुन्हा घडला आहे.
D. यापैकी नाही

Answer ||| C

4.अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम 1989 नुसार खालीलपैकी कोणते गृहीत तत्त्व अयोग्य आहे?

अ) एखाद्या व्यक्तीने आरोपीला आर्थिक मदत केली होती तर त्या व्यक्तीने अपराध करण्यास प्रोत्साहन दिले होते असे गृहीत धरले जाईल.

ब) अपराध्याला अत्याचारग्रस्ताची वैयक्तिक माहिती नव्हती हे सिद्ध होईपर्यंत न्यायालय असे गृहीत धरेल की अपराध्याला त्याच्या जातीची कल्पना होती.

A. फक्त अ
B. फक्त ब
C. दोन्ही
D. दोन्ही नाही

Answer ||| D

5.कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 च्या कलम 2(K) नुसार आर्थिक लाभ म्हणजे-

अ) नुकसान भरपाई

ब) दैनंदिन खर्चाच्या पूर्ततेसाठी तसेच पीडित महिलेला झालेल्या नुकसान भरपाईपोटी देण्यात येते ती आर्थिक नुकसान भरपाई.

क) कौटुंबिक हिंसाचार दूर करण्यासाठी दिलेली नुकसान भरपाई

ड) दावा निकालात काढताना दिलेली अंतिम नुकसान भरपाईची रक्कम

A. अ आणि ब दोन्ही
B. फक्त ब
C. फक्त ड
D. फक्त क

Answer ||| B

6.श्री 'अ ब क' यांनी चांगुलपणाने घरगुती जुलमाचे कार्य घडल्याची माहिती दिली, चौकशीअंती घरगुती जुलूम झाला नसल्याचे स्पष्ट झाले, तर कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 नुसार श्री 'अ ब क' वर-

A. कोणतीही दिवाणी अथवा फौजदारी कारवाई करता येणार नाही
B. फौजदारी नाही पण दिवाणी कारवाई करता येईल
C. फौजदारी व दिवाणी दोन्ही कारवाया करता येतील
D. केवळ फौजदारी कारवाई करता येईल.

Answer ||| A

7.कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005 नुसार खालील विधानांचा विचार करा आणि अयोग्य विधान निवडा.

अ) कलम 22 नुसार अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही नमूद असले तरी संरक्षण आदेश किंवा आर्थिक सहाय्यासाठी या अर्जावरील सुनावणी दरम्यान पीडित व्यक्तीकडे मुलाचा किंवा मुलांचा तात्पुरता ताबा देण्यासाठी न्यायदंडाधिकारी मंजुरी देऊ शकतात.

ब) कलम 21 नुसार या कायद्याने मंजूर केलेल्या इतर सहाय्याशिवाय न्याय दंडाधिकारी हे पीडित व्यक्तीच्या अर्जावरून प्रतिवादीने कौटूंबिक हिंसाचारामुळे झालेल्या भरपाई साठी नुकसान भरपाई आदेश देऊ शकतात.

A. फक्त अ
B. फक्त ब
C. अ आणि ब दोन्ही
D. अ आणि ब दोन्ही नाही

Answer ||| C

8.नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 च्या तरतुदीनुसार खालीलपैकी कोणते कृत्ये अपराध ठरतील?

A) 'क्ष' या व्यक्तीने आपल्या परसदारी असलेल्या खाजगी विहिरीचे पाणी घेण्यास विशिष्ट लोकांना मनाई केली.

B) रस्त्यावरील केशकर्तनालयात विशिष्ट जाती धर्माच्या लोकांना प्रवेश नाकारला.

C) जातीच्या कारणावरून शाळेने काही विद्यार्थ्यांची वेगळी तुकडी केली.

D) 'क्ष' ने विशिष्ट जातीतल्या व्यक्तीशी विवाह केल्यामुळे क्ष आणि त्याच्या कुटुंबीयांना जातीबाहेर टाकले.

पर्याय-

A. B, C, D
B. B, C
C. B, D
D. वरील सर्व कृत्ये अपराध ठरतील.

Answer ||| D

9.नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 मध्ये______याकरिता शिक्षेची तरतूद आहे.

A. अस्पृश्यतेच्या कारणावरून व्यक्तीला रुग्णालयात दाखल करून घेण्यास नाकारणे.
B. अस्पृश्यतेच्या कारणावरून वस्तूची विक्री करण्यास किंवा सेवा पुरविण्यास नकारणे.

byjusexamprep.com

C. अस्पृश्यतेवरून उत्पन्न होणारे इतर अपराध.
D. वरील सर्व

Answer ||| D

10.नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 च्या कलम 7A नुसार खालीलपैकी कोणते काम करण्याची सक्ती केल्यास अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी सामाजीक निसमर्थता लादली असे मानले जाईल?

A) मेहतर काम

B) सफाईगाराचे काम

C) प्राण्याचा मृतदेह उचलण्याचे काम

D) प्राण्याचा मृतदेह फाडण्याचे काम

E) नारळ फोडण्याचे काम

पर्याय

A. फक्त B, C, D
B. फक्त A, B
C. फक्त A, B, C, D
D. वरील सर्व

Answer ||| D

11.हुंडाबंदी अधिनियम 1961 च्या कलम 6 नुसार संपत्तीचा हक्क असलेल्या स्त्रीचा विवाहापासून सात वर्षांच्या आत संपत्ती मिळण्यापूर्वी अनैसर्गिक मृत्यू झाल्यास ती संपत्ती खालीलपैकी कोणाकडे हस्तांतरित करण्यात येते?

अ) स्त्रीला अपत्य नसल्यास तिच्या पालकांकडे

byjusexamprep.com

ब) स्त्रीला अपत्य असल्यास त्या आपत्याकडे

क) स्त्रीच्या पतीकडे

A. फक्त अ
B. फक्त अ, ब
C. फक्त क
D. वरील सर्व

Answer ||| B

12.हुंडा प्रतिबंध अधिनियम 1961 च्या कलम 8(B) नुसार हुंडा प्रतिषेधी अधिकार्यांचे पुढीलपैकी कोणते कर्तव्य आहे?

अ) या कायद्याचे पालन होत आहे हे पाहणे.

ब) हुंडा देणे किंवा घेणे किंवा अपप्रेरणा देणे या गोष्टींना शक्य तेवढा प्रतिबंध करणे.

क) अपराधी व्यक्तीला शिक्षा सुनावणे

A. फक्त अ
B. फक्त अ आणि ब
C. फक्त अ आणि क
D. वरील सर्व

Answer ||| B

13.फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 27 नुसार जर 16 वर्षाखालील बालकाने केलेला अपराध मृत्युदंड किंवा आजीवन कारावास या शिक्षेचा नसेल तर त्याची संपरीक्षा पुढीलपैकी कोणत्या न्यायालयाकडून केली जाईल?

byjusexamprep.com

A. मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय.
B. बालक अधिनियम 1960 अन्वये नेमलेले न्यायालय.
C. अल्पवयीन मुलांचे उपचार-पुनर्वसन प्रशिक्षण या संदर्भातील कायद्यान्वये नेमलेले न्यायालय.
D. वरील सर्व

Answer ||| D

14.फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 37 नुसार दंडाधिकाऱ्यांना व पोलिसांना जनतेने काय सहाय्य करावयाचे?

A. अटकेतून पळून जाण्यास प्रतिबंध करणे.
B. शांतता भंगास प्रतिबंध करणे
C. सार्वजनिक मालमत्तेस नुकसान पोहोचविण्यास प्रतिबंध करणे.
D. वरील सर्व

Answer ||| D

15.फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 नुसार अयोग्य जोडी ओळखा.

A. कलम 41(A) - पोलीस अधिकाऱ्यासमोर उपस्थित होण्याची नोटीस.
B. कलम 41(B) - अटकेची कार्यपद्धती व अटक करणाऱ्या अधिकाऱ्याची कर्तव्ये.
C. कलम 41(C) - जिल्ह्यातील नियंत्रण कक्ष.
D. कलम 41(D) - दंडाधिकार्यांकडून अटक.

Answer ||| D

byjusexamprep.com